कला अकादमी गोवा
पणजी–गोवा
कअ/गु.पो.सं.मे/२०२२–२३/७४४
दि. ०७/०७/२०२२

# कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमी गोवा व कला व संस्कृती संचालनालय, पाटो, पणजी–गोवा यांच्या संयुक्त विद्यमाने कला अकादमीच्या हिंदुस्थानी संगीत व नृत्य विभागातर्फे गुरुपौर्णिमेचे औचित्य साधुन दि. १४ जुलै २०२२ रोजी ठिक दु. २.३० वाजल्यापासून हिंदुस्थानी संगीत व नृत्य विभागातील विद्यार्थांचा शास्त्रीय गायन, वादन व नृत्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. तसेच दि. १५ जुलै २०२२ रोजी स. ठिक १०.०० वाजल्यापासून कला अकादमीच्या पेडणे, साखळी, वाळपई, सांगे, केपे व काणकोण या संगीत केंद्राच्या विद्यार्थांचा "संगीत मेळावा" हा गायन वादन कार्यक्रम होणार आहे. दि. १४ जुलै रोजी दु. २.३० वाजता मान्यवरांच्या हस्ते दिप प्रज्वलनाने कार्यक्रमाचे उद्‌घाटन होणार आहे. हा कार्यक्रम कला व संस्कृती संचालनालयाच्या मल्टीपर्पज सभागृहात संपन्न होणार आहे.

उद्‌घाटनानंतर कार्यक्रमाची सुरुवात श्री. रोहित वनकर यांचे शिष्य कु. यश आपटे व कु. अथर्व गायक यांच्या बासरीवादनाने होणार आहे. त्यानंतर श्री. प्रेमानंद आमोणकर यांचे शिष्य कु. साहिल नदाप, कु. मयुश गावस, कु. लक्ष मठकर व कु. दिपतेज रेवोडकर यांचे तबला सहवादन होणार आहे. तबला वादनानंतर श्री. सचिन तेली यांची शिष्या कु. मुक्ता मिसर हिचं शास्त्रीय गायन होणार आहे. त्यानंतर श्री सुभाष फातर्फेकर यांचे शिष्य कु. आकाश नाईक यांचे संवादिनी एकलवादन होणार आहे. तदनंतर श्री शैलेश गांवकर यांचे शिष्य कु. कौस्तुभ च्यारी व कु. जित सावंत यांचे तबला सहवादन होणार आहे. तबला सहवादनानंतर श्री. रुपेश गांवस यांचे शिष्य कु. सदानंद झो यांचे शास्त्रीय गायन होणार आहे. त्यानंतर श्री. नंदा कळंगुटकर यांचे शिष्य कु. मयुरेश तांबोसकर यांचे संवादिनी एकलवादन होणाार आहे. त्यानंतर कथ्थक नृत्य सादर करण्यात येईल. त्यामध्ये सौ. वरदा बेडेकर यांच्या शिष्या कु. स्पुर्ती शानबाग, कु. अभिशेक नाईक, कु. अलिशा अल्मेदा, कु. चेलसिया डिसोझा, कु. श्रेया कवळेकर व कु. विजय पालकर हे सहभागी होतील. तदनंतर सौ. मंदिरा तिरोडकर यांच्या शिष्या कु. वैष्णवी नाडकर्णी, कु. तन्वी देसाई, कु. मनस्वी बोडके, कु. कस्तुरी करकरे व कु. निधी नाईक शिरोडकर यांच्या भरतनाटयम नृत्याचा कार्यक्रम होणार आहे. व कार्यक्रमाची सांगता सौ.

सपना नाईक यांच्या शिष्यांचे भरतनाटयम नृत्य होणार आहे. त्यामध्ये कु. आकृती ताम्हणकर, कु. गौरी सानबाग, कु. अनुश्री कोली, कु. तृप्ती दळवी, कु. महिका हरमलकर व कु. शहिल्या सातार्डेकर या विद्यार्थीनी सहभागी होणार आहे. संपुर्ण कार्यक्रमासाठी श्री पांडुरंग गावस, श्री. दयानिधेश कोसंबे, श्री. गितेश मांद्रेकर, श्री. सुरज मोरजकर, श्री भार्गवराम गर्दे व श्री. श्रीपाद गांवस यांची तबलासाथ तसेच श्री. दत्तराज सुर्लकर व श्री चारुदत्त गांवस यांची संवादिनीची साथ लाभणार आहे. कथ्थक नृत्याच्या कार्यक्रमासाठी सौ. वरदा बेडेकर यांची पडंतची साथ तसेच सौ. सम्राज्ञी आईर यांची गायन साथ व श्री रोहित वनकर यांची बासरीची साथसंगत लाभणार आहे.

भरतनाटयम नृत्यासाठी सौ. मंदिरा तिरोडकर व सौ. सपाना नाईक ह्या नटवंगमची साथ देणार आहे. तसेच डॉ. दिप्ता रुबसुंदरम् यांची गायन साथ व श्री. चेथनमुर्ती डी. आर. यांची मृदंगमची साथसंगत लाभणार आहे. संपुर्ण कार्यक्रमाच्या निवेदनाची बाजु कु. गौरवी फडके, कु. जान्हवी म्हांबरे व कु. आर्या रेगे ह्या साभाळणार आहेत.

दुस-या दिवशी दि. १७ जुलै २०२२ रोजी स. ठिक १०.०० वाजल्यापासून कला अकादमीच्या सर्व संगीत केंद्रातील विद्यार्थ्यांचा शास्त्रीय गायन वादनाचा कार्यक्रम कला व संस्कृती संचालनालयाच्या मल्टीपर्पज सभागृहात संपन्न होणार आहे. तरी सर्व रसिक श्रोत्यांनी या दोन्ही दिवसाच्या संगीत कार्यक्रमाचा आस्वाद घ्यावा, सदर कार्यक्रम हा सर्वांसाठी खुला आहे. तरी आपण सर्वांनी या कार्यक्रमास उपस्थिती लावावी असे कला अकादमीच्या हिंदुस्थानी संगीत व नृत्य विभागातर्फे कळविण्यात येत आहे.

हिंदुस्थानी संगीत व नृत्य विभाग
कला अकादमी गोवा

प्रति

१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.गोवादूत ६.लोकमत ७.दै.हेराल्ड

८.गोवनवार्ता ९.आकाशवाणी पणजी केंद्र (वृत्तविभाग) १0.दै.भांगरभूंय ११. गोवा दुरदर्शन

एसएस